




PATODA SANCHAR

# पाटोदा संचार

संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे | संपादक-विलास डोळसे | E-mail-pat.sanchar@gmail.com

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक २६६ वा ❑ बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -266 ❑ Wednesday 10 December 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359


## बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांवर कडक कारवाई सुरु; युडीआयडी कार्ड सादर करणे सक्तीचे; मंत्र्यांची माहिती

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपुरात राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. यावेळी अधिवेशनाचा आज दुसरा दिन आहे. विधानसभा सदस्य बापू पठारे, बबनराव लोणीकर, सुनील प्रभू, विजय वडेट्टीवार, विक्रम पाचपुते, हेमंत उगले या सदस्यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र संदर्भात प्रश्न उपस्थित केला, यावर इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी उत्तर दिले.

राज्यातील सर्व शासकीय कार्यालये व विभागांमध्ये युनिक डिसॅबिलिटी आयडी (युडिआयडी) कार्ड सादर करणे ९ ऑक्टोबर २०२५ पासून सक्तीचे करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय सर्व विभागांना कळविण्यात आला आहे. आरक्षण, पदोन्नती, विविध शासकीय सवलती यांसाठी यूडीआयडी कार्ड अनिवार्य असून, जानेवारी २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांना कागदपत्रांची पडताळणी सादर करणे आवश्यक असल्याचे इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

**बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारकांवर कारवाई**

राज्यात काही ठिकाणी बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचे प्रकार आढळल्याने त्यावर मोठी कारवाई सुरू आहे. सातारा जिल्ह्यात ५९८ पैकी ७८ जण, पुण्यात ४२८ मधील ४६ जण, लातूरमध्ये २६ जण तर यवतमाळमध्ये २१ कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. नंदुरबारमध्येही २ कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे. सर्व प्रकरणे संबंधित महसूल, सार्वजनिक बांधकाम तसेच इतर नियुक्ती करणाऱ्या विभागांकडे पाठविण्यात आली असून, तिन्ही महिन्यांत कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**प्रमाणपत्र तपासणीसाठी आठवड्यात किमान दोन दिवस**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्तींवर दिव्यांग अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. शासकीय रुग्णालयांनी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीसाठी आठवड्यात किमान दोन दिवस उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचनाही शासनाने दिल्या असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

**गंभीर चौकशी व कठोर कारवाई करण्याचे आश्वासन**

दरम्यान, अहमदनगर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये 'वैश्विक दिव्यांग प्रणाली'चा पासवर्ड चोरीला गेल्याची माहिती समोर आली असून, याबाबत गंभीर चौकशी व कठोर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

यूडीआयडी प्रणालीवरील नियम हे केंद्र शासनाने ठरविलेले असल्याने राज्य सरकारला त्यात स्वतंत्र बदल करण्याचे अधिकार नाहीत; तथापि, आवश्यक सूचना केंद्राकडे पाठविण्यात येतील, असेही मंत्री सावे यांनी सांगितले.

## आईच्या जातीच्या आधारावर मुलीलाही मिळेल जात प्रमाणपत्र, सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

नवी दिल्ली । वृत्तसेवा

सर्वोच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार मोठे पाऊल उचलले आहे. अल्पवयीन मुलांना त्यांच्या आईच्या जातीच्या आधारावर अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करण्याची परवानगी देणारा आदेश नुकताच सुप्रीम कोर्टाने दिला आहे.

पुदुचेरीतील एका विशिष्ट प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

पुदुचेरी येथील एका अल्पवयीन मुलीच्या आईने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाला बागची यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. मुलीची आई 'आदि द्रविड' या अनुसूचित जाती समुदायातील आहे. आईच्या याच जातीच्या आधारावर मुलीला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करण्याची परवानगी सुप्रीम कोर्टाने दिली.

विशेष म्हणजे, या प्रमाणपत्राअभावी मुलीच्या शिक्षणावर कोणताही परिणाम होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. खंडपीठाने मद्रास हायकोर्टाच्या आधीच्या आदेशाला आव्हान देण्यास नकार दिला.

**'बदलत्या काळात' नियमांमध्ये बदल आवश्यक**

यावेळी सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने एक अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. बदलत्या काळात, आईच्या जातीच्या आधारावर जात प्रमाणपत्र का जारी करू नये? असे खंडपीठाने नमूद केले. या विधानावरून हे स्पष्ट होते की, जात पान दोन वर

## गुंठेवारीची सत्यप्रत देण्यासाठी हजार रुपयांची लाच घेताना नगर परिषदेतील मस्के एसीबीच्या जाळ्यात

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेत गुंठेवारीची सत्यप्रत देण्यासाठी अभिलेख विभागातील आशिष मस्के यांना १ हजार रुपयांची लाच स्वीकारताना मंगळवार (दि.९) रोजी बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.

बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस लाचखोरीच्या घटना वाढत आहेत. त्यातच बीड नगरपरिषदेत गुंठेवारीची सत्यप्रत देण्यासाठी अभिलेख विभागातील आशिष मस्के यांना एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना मंगळवार (दि.९) रोजी बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे बीडचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या घटनेने बीड नगरपरिषदेत खळबळ उडाली आहे.

## मस्साजोगमध्ये ९ डिसेंबर काळा दिवस म्हणून पाळणार

### अधिवेशनामध्ये संतोष देशमुख प्रकरणावर निवेदन दिलं जावं; धनंजय देशमुखांची मागणी



बीड । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला एक वर्ष पूर्ण झाले असून आज मस्साजोग येथे काळा दिवस पाळला जाणार आहे. इतकच नाही तर प्रत्येक वर्षी ९ डिसेंबर हा काळा दिवस म्हणून असेल. त्याचबरोबर सरपंच देशमुख हत्या प्रकरणावर विधानसभेत निवेदन दिलेजावे, अशी मागणी सरपंच संतोष देशमुख यांचेबंधू धनंजय देशमुख यांनी केली आहे.

आमचा निष्पाप माणुस गेला आहे. त्यामुळे आज मस्साजोगमध्ये काळा दिवस पाळण्यात येणार आहे. आज गुन्हेगारांचा जाहीर निषेध गावकऱ्यांकडून केला जाणार आहे. ९ डिसेंबर मस्साजोगसाठी कायमचा काळा दिवस असेल, असं आज आम्ही जाहीर करणार पान दोन वर

## '...तर महाराष्ट्र बंद', संतोष देशमुख हत्या प्रकरणासंबंधी घडामोडीवर मनोज जरांगेंचा सरकारला थेट इशारा

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग गावचे तत्कालीन सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्येला एक वर्ष पूर्ण होत असताना, या पार्श्वभूमीवर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. या वेळी त्यांनी राज्य सरकारवर आणि विशेषतः नाव न घेता अजित पवार गटाचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर घेता टीका केली.

जरांगे पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी एक वर्षाच्या आत आरोपींना फाशी दिली जाईल असे आश्वासन दिले होते, मात्र आता या तपासात विलंब होत असून प्रकरण मुद्दाम लांबवले जात असल्याची शंका निर्माण होत आहे.




त्यांनी स्पष्ट केले की संतोष देशमुख यांच्या लहान मुलांना आज वडील दिसत नाहीत, त्यामुळे आरोपींना कठोर शिक्षा होईपर्यंत समाधान मिळणार नाही. काही लोकांना आरोपी सुटणार आहे अशा अफवा पसरवण्यास सांगितले जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. यावेळी त्यांनी परळीकर हा शब्दप्रयोग केला आहे.

जरांगे पाटील यांनी इशारा दिला की, ज्या दिवशी या प्रकरणातील आरोपीला मुक्त केले जाईल, त्या दिवशी जिल्हा बंद करण्यात येईल आणि त्यानंतर राज्यही बंद करण्याची वेळ येईल. जरांगेंनी सरकारला प्रश्न केला की, काहीजण अशा प्रकारे वातावरण निर्मिती करतात आणि सरकारला अडचणीत टाकण्याचे वक्तव्य का करतात, हे शोधण्याची गरज आहे. आरोपी सुटणार नाही, हे सत्य आहे, असे ते म्हणाले. तसेच, हा सगळा प्रकार काही व्यक्तींनी आखून आणल्याचा त्यांनी दावा केला आहे.

जरांगे पाटील म्हणाले की, तपास सुरुवातीला वेगाने सुरू होता पान दोन वर

## बोगस खत विक्री करणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्र यांच्यावर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

बोगस खत विक्री करणारे काव्या अग्रो चे प्रतिनिधी राधेशाम काकडे व खत पुरवठा करणारी कंपनी विदूत अग्रो केम प्रा. लि. रायगडचे संचालक निखील कासोळे यांच्या विरूद गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, आशीष काळूसे, तंत्र अधिकारी गु. नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद सायप्पा गरांडे मोहीम अधिकारी जिल्हा परीषद वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक यांच्या उपस्थितीत गणेश हिरे खत निरिक्षक तथा कृषी अधिकारी (गु.नि.) गेवराई यांनी दि. ८ डिंसेबर २०२५ रोजी भरारी पथकाने काव्या आग्रो मोंढा रोड गेवराई जिल्हा बीड येथे तपासणी केली असता सदरील ठिकाणी मिश्र खताचे ग्रेड NPK १०:२०:२० व २०: २०: ००. पुढील मजकुराचे एकुन ५५ बॅग (प्रति बॅग ५०kg) असल्याचे आढळून आले.

१) खताचे नाव-NPK 10:20:20 (Granulated Mizu Fertiliser )-37 Bag d NPK-20:20:00 (GranulatedMix fertilizer)-18 Bag

२) उत्पादकाचे नाव - मे. Sivaji agro crops जालना

३) खताचा ब्रॅंड - जय किसान

४) विपणन कर्त्याचे नाव: Vidyut agro chem. Pvt.Ltd sec. 18 SNo-6. New Panvel Raigad -410206.

याबाबत काव्या ॲग्रो यांना खताचे खरेदी बिले मागितले असता त्यांच्याकडे बिल नसलेबाबत सांगितले. त्यानंतर संबंधित उत्पादक शिवाजी ॲग्रो क्रॉप जालनाचे प्रतिनिधी पान दोन वर

# शिकायला शाळेत या अन् शौचालयाला घरी जा!

## बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था!

**बीड । प्रतिनिधी**

शाळा म्हणजे विद्येचं मंदिर. सध्याच्या काळात सर्व शाळांचं आधुनिकीकरण होत आहे. खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांना सर्व आधुनिक सुविधा मिळत आहेत. असंच शिक्षण जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मिळावं यासाठी सरकार विविध योजनांची घोषणा करत असतं. परंतु, खरंच सरकारच्या योजना जिल्हा परिषद शाळांपर्यंत पोहोचतात का? असा प्रश्न उपस्थित झालाय, कारण बीड तालुक्यातील एका शाळेमध्ये शौचालयाची परिस्थिती चांगली नसल्यामुळं विद्यार्थ्यांना शौचासाठी आपल्या घरी जावं लागतंय, असा खळबळजनक प्रकार समोर आलाय. या घटनेची बीड प्राथमिक शिक्षण विभागानंही गंभीर दखल घेतलीय.

**अभियान फक्त कागदावरच?**

राज्यात जिल्हा परिषद शाळांची परिस्थिती बिकट बनली आहे. पावसाळ्यात अनेक शाळांच्या छतामधून पावसाचं पाणी वर्गात येत होतं. वर्गाच्या खोल्यांचे दरवाजे आणि खिडक्या सुस्थितीत नसल्यामुळं थंडीत कुडकुडत शिक्षणाचे धडे गिरवण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आलीय. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशांनुसार 'जागतिक शौचालय दिना'पासून ते 'मानवी




हक्क दिना''पर्यंत म्हणजे १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात 'हमारा शौचालय, हमारा अभिमान' ही विशेष मोहीम राबविण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने दिले होते. जिल्ह्यातील १ हजार ३५६ गावांमध्ये वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी व नियमित वापर सुनिश्चित करण्यात यावी, असं आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केलं होतं. शौचालय म्हणजे केवळ सुविधा नव्हे तर पान दोन वर

### अभियानाबद्दल स्थानिक प्रतिनिधींना माहिती नाही

महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी आणि शाळेचे शिक्षक रोहन मुंडे यांना या विशेष मोहिमेबाबत विचारलं असता ते म्हणाले अभियान सुरू असल्याची कोणतीही सूचना किंवा पत्र आम्हाला प्रशासनाकडून मिळालंच नाही.

### विद्यार्थ्यांनी व्यक्त केली भावना

शाळेचं शौचालय वापरातच नाही. त्यामुळं सरांना सांगून घरी जावं लागतं, असं शाळेची विद्यार्थिनी सई घरत हिनं सांगितलं. माझं घर लांब आहे, म्हणून मी शौचासाठी मित्र विराज घरतच्या घरी जातो, असं विद्यार्थी चैतन्य घरत यानं सांगितलं.

### ...तर संबंधितांवर कारवाई करणार

प्रत्येक गावातील शाळेचं शौचालय स्वच्छ ठेवणं हे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आणि शालेय शिक्षण समिती यांचं ते काम आहे. शौचालय जर स्वच्छ नसेल तर संबंधित गटशिक्षणाधिकारी त्याचा आढावा घेत अहवाल आमच्याकडं सादर करतील. संबंधित शौचालय स्वच्छ नसेल तर संबंधित शाळेचे मुख्याध्यापक आणि शालेय शिक्षण समितीची ती जबाबदारी असेल, अशी प्रतिक्रिया बीड प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी दिली.

त्यामुळं विद्यार्थी हे शाळेत शिक्षणाचे धडे गिरवण्यासाठी येत असतात. त्यांना सुविधा पुरवणं हे प्रशासनाचं काम आहे. या निमित्तानं तरी बीड जिल्हा प्रशासन जागे होईल का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

पाटोदा संचार

# मी माझ्या पगारावर समाधानी आहे!'

सरकारी कार्यालयात चिरिमिरी दिल्याशिवाय काम होतं नाही, अशी परिस्थिती आहे. मी माझ्या पगारावर समाधानी आहे. आज महाराष्ट्रात लाखो रुपयांची नोटांचे बंडलचे दोन प्रकरण गाजत असताना एका अधिकाऱ्याने त्यांच्या टेबलावर लावलेली पाटी सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. ही पाटी लावली आहे नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात कार्यरत अतिरिक्त महसूल आयुक्त राजेश खवले यांनी. खवले यांनी त्यांच्या कार्यालयातील टेबलावर त्यांच्या नेमप्लेटसह मी माझ्या पगारावर समाधानी असल्याचे लिहिले आहे.

सर्वसामान्य माणूस एखादं शासकीय काम करण्यासाठी कार्यालयात जाताना अनेकवेळा विचार करतो. सरकारी कार्यालयात कुठलंही काम वेळेत आणि चिरिमिरी दिल्याशिवाय होत नाही, अशी परिस्थिती उघडपणे बोलली जाते. परंतु शासनाचे सगळेच अधिकारी आणि कर्मचारी चिरिमिरी घेऊन काम करतात असं नाही. यामध्ये काही आपल्या पदाशी एकनिष्ठ राहून सर्वसामान्य जनतेचं काम करत असतात. अशाच एका प्रामाणिक अधिकाऱ्यानं आपल्या टेबलावर लावलेली प्लेट चर्चेचा विषय बनली आहे. त्याचं कारण म्हणजे अधिकाऱ्यानं 'मी माझ्या पगारावर समाधानी आहे!' असं लिहून एक प्रकारे भ्रष्टाचार करायला भाग पाडणाऱ्या लोकांना संदेश दिला आहे.

पाच महिन्यांपूर्वी मी माझ्या पगारात खुश असल्याची प्लेट माझ्या टेबलावर लावली आहे. या माध्यमातून मी माझ्या विभागात काम घेऊन येणाऱ्या सर्वसामान्य जनतेच्या अधिक जवळ जाऊ शकलो. लोकांच्या मनात असलेली किंतु– परंतुची भावना यानिमित्तानं दूर झाली. माझ्या अधिनस्त काम करणारे इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करू शकलो, अशी भावना राजेश खवले यांनी व्यक्त केली.

अमरावती जिल्ह्यातील माहुली जहांगीर या गावात राजेश खवले यांचा जन्म झाला. त्यांना सुरूवातीपासून प्रशासकीय सेवेत रुजू व्हायची इच्छा होती. त्यामुळं त्यांनी तसे प्रयत्न सुरू केले. १९९८ मध्ये पदवीपर्यंतचं शिक्षण झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून देण्यात येणाऱ्या विविध परीक्षा दिल्या. ते सुरुवातीला मंत्रालय सहायक म्हणून रुजू झाले. त्यानंतर पुन्हा एमपीएससीची परीक्षा देऊन २००० मध्ये उपजिल्हाधिकारी बनले.

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयातील एका अधिकाऱ्यानं ही प्लेट लावली आहे. नागपूर आयुक्त कार्यालयातील महसूल अपर आयुक्त राजेश खवले यांनी ही नेमप्लेट लावली आहे. 'मी माझ्या पगारावर समाधानी आहे!' असं लिहिलेली एक प्लेट त्यांनी आपल्या टेबलावर ठेवली आहे. सरकारी काम करताना अनेकजण आपली कामं ही लवकर व्हावीत, यासाठी अधिकाऱ्यांना लाच देण्याचा प्रयत्न करतात. या प्रकाराला आळा घालण्यासाठी महसूलचे अपर आयुक्त राजेश खवले यांनी अतिशय वेगळ्याच पद्धतीनं आपला संदेश भ्रष्टाचार करू पाहणाऱ्या लोकांना दिला आहे.

सरकारी कामे जलद व्हावीत किंवा ती कायद्याच्या कचाट्यात अडकू नयेत, यासाठी अनेकदा नागरिक अधिकाऱ्यांना लाचेचे आमिष दाखवतात. अशा अर्थपूर्ण व्यवहारांना कार्यालयात थारा नसल्याचे खवले यांनी आपल्या नेमप्लेटद्वारे ठणकावून सांगितले आहे. त्यांच्या या कृतीची महसूल विभागात आणि प्रशासकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

सरकारी व्यवस्थेतील प्रामाणिकपणा आणि स्वच्छता यावर थेट प्रकाश टाकणारे हे विधान सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहे. कार्यालयात येणाऱ्या लोकांकडून काम लवकर करून घेण्यासाठी किंवा एखादे बेकायदेशीर काम कायदेशीर करण्यासाठी अधिकाऱ्यांना लाच देण्याचा प्रयत्न केला जातो. काहीजण गोड बोलणे किंवा ओळखीचा आधार लावूनही दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. मात्र, अशा लोकांना आधीच स्पष्ट संदेश देणारी ही नेमप्लेट अनेकांसाठी धडा ठरतेय.

# बाबा आढाव : अन्यायाविरुद्ध झुंज देणारा संघर्षयोद्धा



दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी पुणे येथे ज्येष्ठ समाजवादी नेते, विचारवंत, श्रमिकांचा आवाज, रिक्षाचालक-कामगार-हमाल-वंचित घटकांसाठी आयुष्य अर्पण करणारे प्रख्यात समाजसेवक बाबा आढाव यांचे निधन झाले आणि महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील सामाजिक चळवळींचा एक दीपस्तंभ कायमचा मावळला आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील श्रमिक चळवळींच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय संपुष्टात आला आहे. ते ९५ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून तब्येत बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु दि. ०८ डिसेंबर रोजी उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती नव्हे तर चार-पाच पिढ्यांना दिशा देणारी मूल्यव्यवस्था, आंदोलनाची परंपरा आणि सामाजिक न्यायाची अखंड ज्वाला हरवली आहे.

बाबा आढाव यांचा जन्म १९३० च्या दशकात झालेला असला तरी त्यांचे आयुष्य गांधी-समाजवादी तत्त्वज्ञानावर बेतलेले होते. मार्क्सवादी विचारधारा, समाजवादी विचार आणि मानवी हक्क हे त्यांच्या कार्याचे मूळ केंद्र होते. त्यांनी महाविद्यालयीन काळातच समाजाची खरी वास्तवता जवळून पाहिली आणि अन्याय, विषमता आणि शोषण याविरुद्ध एक लढवय्या व्यक्तिमत्त्व त्यांच्या अंतर्मनात तयार झाले. त्या काळापासून मृत्यूपर्यंत त्यांनी एकही दिवस अन्यायाविरुद्धची भूमिका ढिली केली नाही. सत्ता, मान-सन्मान, पद, लाभ यापासून कायम दुरावलेल्या पण लाखो लोकांच्या अंतःकरणात महत्त्वपूर्ण स्थान असलेले ते खरे सामाजिक नेता होते.

बाबा आढाव यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे महाराष्ट्रातील असंघटित मजूर आणि श्रमिक घटकांना संघर्षाची भाषा, संघटनेचे बळ आणि अधिकारांचे भान देणे. हमाल, रिक्षाचालक, बांधकाम कामगार, साखर कारखान्यांतील स्थलांतरित कामगार, महिला श्रमिक, ग्रामीण कामगार यांना संघटित करण्याचे ऐतिहासिक काम त्यांनी केले. पुण्यात त्यांनी स्थापन केलेली हमाल-मजूर पंचायत आणि नंतर महाराष्ट्रभर उभारलेल्या सामाजिक न्याय आंदोलनांनी अनगणित कुटुंबांचे आयुष्य बदलले. श्रमिक वर्गाला किमान वेतन, नोंदणी हक्क, आरोग्य सुरक्षा, पेन्शन, शासकीय योजना, शोषणापासून मुक्ती, मानवी सन्मान आणि श्रमाचा आदर या मूलभूत हक्कांसाठी त्यांनी सातत्याने लढा दिला.


डॉ. राजेंद्र बगाटे
मो. क्र. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5gmail.com

बाबा आढाव यांचे आंदोलन हिंसाचारी नव्हते; ते तत्त्वनिष्ठ, अहिंसावादी आणि मानवी हक्कांवर आधारलेले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ऐतिहासिक सत्याग्रह झाले. त्यांचा संघर्ष मात्र प्रखर होता आणि त्यात भीडण्याची क्षमता असंख्य सामान्य माणसांना त्यांनी दिली. त्यांच्या नेतृत्वात हजारो रिक्षाचालकांनी रस्त्यावर उतरून न्याय मिळवला. त्यांनी रिक्षाचालकांना फक्त भाडे नव्हे तर सन्मान मिळायलाच हवा या विचाराला सार्वजनिक व्यासपीठावर मान्यता मिळवून दिली. शहरातील आणि ग्रामीण भागातील श्रमिकांना नागरिकत्वाची जाणीव देणारा नेता म्हणजे बाबा आढाव होते. हे वाक्य आज समाजविज्ञानाच्या अभ्यासक्रमांमध्ये उदाहरण म्हणून नोंदले जाते.

बाबा आढाव यांच्या विचारविश्वात फक्त श्रमिक प्रश्न नव्हते; जातीय असमानता, भेदभाव, ग्रामीण दारिद्र्य, महिला हक्क, शेती-अर्थव्यवस्था, शिष्टाचार नसलेली विकासनीती आणि राजकीय स्वार्थ याविरुद्धही त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे. त्यांचे प्रसिद्ध आंदोलन एक गाव, एक पाणवठा हे भारतातील सामाजिक समतेच्या इतिहासातील मोठा अध्याय आहे. अस्पृश्यतेविरुद्ध, जातभेदाविरुद्ध आणि सामाजिक एकात्मतेसाठी त्यांनी लढविलेली चळवळ ही महाराष्ट्रातील फुले-शाहू-आंबेडकर परंपरेचा पुढचा टप्पा मानली जाते.

त्यांच्याकडे कोणतेही सरकारी पद, राजकीय महत्त्वाकांक्षा किंवा सत्ता मिळविण्याचा आग्रह नव्हता. गांधीजींप्रमाणे साधेपणा, लोकहित आणि तत्त्वनिष्ठता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आधारस्तंभ होते. खादीचे कपडे, साधी जीवनशैली, अत्यंत संयमी संवाद, पण त्याहूनही कठोर प्रश्न विचारण्याची क्षमता यातून त्यांची ओळख तयार झाली. समाजवादी पक्षाच्या वैचारिक परंपरेचे ते जिवंत प्रतीक होते. अनेक पिढ्यांवर त्यांनी केलेले वैचारिक संस्कार आजही सामाजिक चळवळींचे मार्गदर्शक मानले जातात. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील सामाजिक आंदोलनांना, कामगार संघटनांना, प्रगतिशील साहित्याला आणि अभ्यासक-विद्यार्थी-संशोधकांना जणू दिशा देणारा दीपस्तंभ हरवला आहे. आज अनेक लोक ज्या सुविधा, सुरक्षा आणि अधिकारांचा लाभ घेतात, त्या अधिकारांवर स्वाक्षरी करण्यासाठी मागे बाबा आढाव यांच्यासारख्या लढवय्या व्यक्तीचे घाम, अश्रू आणि संघर्षाचे वर्षानुवर्षाचे योगदान आहे हे विसरून चालणार नाही.

त्यांच्या निधनाच्या बातमीने देशभरातून शोकसंदेश, श्रद्धांजली आणि कृतज्ञतेचे संदेश येत आहेत. पण खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या विचारांना, संघर्षाला आणि समतेच्या स्वप्नाला पुढील पिढ्यांनी जपणे आणि त्यासाठी आंदोलन सुरू ठेवणे आहे. त्यांच्या जाण्याने शरीर थांबले असले, तरी त्यांचे विचार, मूल्ये आणि लढा थांबलेला नाही.

आज आपण त्यांना अश्रुपूर्ण निरोप देत आहोत, पण त्याचवेळी त्यांच्या विचारांची मशाल पुढे नेण्याची शपथही घेत आहोत. समाजाच्या शेवटच्या घटकासाठी लढणे, दुर्बलांचे आवाज बनणे आणि न्यायासाठी झगडणे हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र होते, आणि तेच त्यांच्या जीवनाचे खरे स्मारक ठरेल.

बाबा, तुमचा संघर्ष आमच्या श्वासात आहे. आपण आमच्यातून गेलेत, पण तुमचा विचार आमच्यात जिवंत आहे. भावपूर्ण श्रद्धांजली...

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# राज्यातील सुमारे ६० लाख कुटुंबांना मोठा दिलासा देणारे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता विधेयक, २०२५' विधानसभेत मंजूर


**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यातील सुमारे ६० लाख कुटुंबांना मोठा दिलासा देणारे 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५' मंगळवारी विधानसभेत मंजूर झाले. गुंठेवारी आणि लहान भूखंडांवर घरे बांधून राहणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या विधेयकामुळे आता लहान भूखंडांची खरेदी-विक्री सुलभ होणार आहे. तसेच, संबंधित मालकांचे नाव सातबारा उताऱ्यावर स्वतंत्रपणे लागणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. अनेक वर्षांपासून ५-१० गुंठे किंवा त्यापेक्षा कमी जागेत राहणाऱ्या नागरिकांना मालकी हक्काच्या तांत्रिक अडचणींना आणि जमिनीच्या अकृषिक (एनए) वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या वारंवार परवानग्यांना सामोरे जावे लागत होते.

**'एनए' परवानगीची अट शिथिल**

या नवीन सुधारणेनुसार, विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात आता जमिनीच्या 'एनए' वापरासाठी वेगळ्या परवानगीची गरज भासणार



नाही. त्याऐवजी, 'एक वेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि त्रास वाचणार आहे.

**विधेयकावर विरोधकांचा आक्षेप**

शिवसेना (उद्धव ठाकरे) आमदार भास्कर जाधव यांनी हा कायदा बिल्डर लॉबीला अधिक लाभ मिळवून देणारा ठरू शकतो, असा आरोप केला. तर, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी शहरांचे विकास आराखडे तयार नसताना केवळ जागा नियमित करून चालणार नाही, तर ९ मीटरचे रस्ते आणि गटारांची सोय कशी होणार, यावर विचार करण्याची सूचना केली.

चर्चेदरम्यान, अनेक आमदारांनी हा निर्णय केवळ शहरांपुरता न ठेवता ग्रामीण भागासाठीही लागू करण्याची मागणी केली. यावर स्पष्टीकरण देताना मंत्री बावनकुळे यांनी हा कायदा बिल्डरांसाठी नसून, ६० लाख कुटुंबांना कायदेशीर मालकी हक्क देण्यासाठी आणला असल्याचे सांगितले.

**विधेयकाची प्रमुख वैशिष्ट्ये:**

नागरी भागात 'एनए' वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीची गरज नाही.

गुंठेवारी आणि लहान भूखंडांची खरेदी-विक्री आता सुलभ होणार.

६० लाख कुटुंबांच्या सातबारा उताऱ्यावर स्वतंत्रपणे मालकाचे नाव लागणार.

१५ ऑक्टोबर २०२४ नंतर नव्याने तुकडे पाडण्यास मनाई असेल.

हा कायदा सरसकट ग्रामीण भागाला लागू नाही, परंतु रहिवासी क्षेत्र जाहीर झाल्यास लागू होऊ शकतो.

हा निर्णय सर्वसामान्य नागरिकाला त्याच्या जमीनतुकड्याचा कायदेशीर मालक बनवणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## पान एक वरुन

### आईच्या जातीच्या आधारावर

निश्चित करण्याच्या भविष्यातील नियमांमध्ये बदल होऊ शकतात आणि समाजातील बदलांनुसार अशी पाऊले उचलणे आवश्यक आहे.

**वडिलांची जागा आईची जात घेणार का?**

या निर्णयामुळे आता समाजात एक नवी चर्चा सुरू झाली आहे की, आता आईची जात वडिलांची जागा घेईल का? सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, वडिलांच्या जातीच्या आधारावर मुलाची जात निश्चित करण्याचा जुना नियम बदलला जाईल की नाही, हा कायद्याचा प्रश्न अद्याप खुला ठेवण्यात आला आहे. याचा अर्थ असा की, सध्याच्या नियमांमध्ये पूर्णपणे बदल करण्याचे निश्चित केलेले नाही, परंतु कोर्टाचे निरीक्षण भविष्यातील बदलांचे संकेत देते.

या प्रकरणात, मुलीच्या आईचा युक्तिवाद होता की, ती हिंदू आदि द्रविड समुदायाची आहे आणि तिचा पती दलित नसतानाही लग्नानंतर तिच्या आई-वडिलांच्या घरी राहत होता. परिणामी, मुले आईच्या अनुसूचित जातीच्या समुदायात वाढली.

**जुने नियम काय होते?**

केंद्र सरकारच्या नियमांनुसार, अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्रांसाठी प्रामुख्याने वडिलांच्या जातीला प्राधान्य दिले जात होते. मागील निर्णयांमध्ये मुलांची जात वडिलांकडून वारसा हक्काने मिळते असेही म्हटले गेले होते. परंतु, सुप्रीम कोर्टाने पूर्वीच लवचिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. २०१२ मधील एका निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने आंतरजातीय विवाहांच्या परिस्थितीत मुलाची जात ठरवताना लवचिक दृष्टिकोन स्वीकारला. मूल आईच्या अनुसूचित जाती/जमाती समुदायात वाढले असेल, तर ते त्यांच्या आईच्या जातीचे प्रमाणपत्र मागू शकतात, असेही कोर्टाने पूर्वी स्पष्ट केले होते.

### मस्साजोगमध्ये ९ डिसेंबर

असल्याचीमाहिती धनंजय देशमुख यांनी दिली आहे.

**आधी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला असता तर ही घटना झाली नसती**

समोर बलाढ्य यंत्रणा होती. त्यांचं प्रशासनावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न होता, हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. आधी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला असता तर ही घटना झाली नसती. ती ट्रॉसिटी पुन्हा १२ तारखेला दाखल करण्यात आली. जगमित्र कार्यालयातून केज पोलीस स्टेशनला फोन आले होते. या प्रकरणात मोठ्या प्रमाणात बदल्या झाल्या, कमिटी नेमल्या गेल्या, एसआयटी स्थापन झाल्यानंतर आम्ही न्यायासाठी आशावादी झालो. न्यायाच्या प्रवासात उशीर होत आहे. आतापर्यंत या प्रकरणात दोषारोप पत्र दाखल करण्यात झालेले नाही. या आरोपींना फाशी भेटली पाहिजे, आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. आरोपींना फाशी झाल्यावर आम्ही समाधानी असू. त्यांना त्यांच्या कर्माचा फळ भेटणार आहे, अशीभावनाही धनंजय देशमुख यांनी बोलताना व्यक्त केली आहे.

**राजकीय आश्रय असल्याने न्यायासाठी उशीर होतोय**

आमची काही चूक नसताना आमचा माणूस कायमचा हिरावला आहे, त्यांच्या कर्माची शिक्षा त्यांना भेटणार आहे. या प्रकरणात राजकीय आश्रय असल्याने प्रकरणात न्यायासाठी उशीर होत आहे. राजकीय हस्तांतरण असले तर या प्रकरणात वेळोवेळी सिद्ध झाला आहे. दोन नंबरच्या आरोपीच्या पक्षाचे लोकप्रतिनिधी केज आणि बीडच्या कोर्टात आढळून आल्याचे व्हिडिओ देखील आम्ही प्रशासनाला दिले आहेत. याच्यामागे पूर्ण राजकीय ताकद वापरली जात आहे, याचा गांभीर विचार केला गेला पाहिजे. असेही धनंजय देशमुख म्हणाले. याचा विचार मुख्यमंत्र्यांनी, उपमुख्यमंत्र्यांनी केला पाहिजे,

दरम्यान, यासंदर्भात निवेदन अधिवेशनात दिले गेले पाहिजे. यांचा कायमचा बंदोबस्त कसा करता येईल, यावर त्यांनी बोललं पाहिजे. हायकोर्टात काही आरोपींकडून अर्ज केला गेलाय, त्याच्यावर आम्ही आमचे शपथपत्र दिले आहेत. त्याची तारीख १२ डिसेंबरला आहे त्यांच्यापासून आमच्या कुटुंबाला कसा धोका आहे हे आम्ही सांगितलं आहे. कृष्णा आंधळेच्या तपासाचा तीन महिन्याचा अहवाल न्यायालयाने एसआयटी आणि सीआयडीला मागितली आहे. अधिवेशनामध्ये फरार आरोपींना ज्यांनी आश्रय दिला त्यांनी गाड्या पुरवल्या. त्या लोकांना वेगळ्या कायद्याखाली अटक झाली पाहिजे आणि त्यांना शिक्षा झाली पाहिजेचे निवेदन होणे गरजेचे असल्याची माझी मागणी असणार आहे. असेही धनंजय देशमुख म्हणाले.

### '...तर महाराष्ट्र बंद', संतोष देशमुख हत्य

कारण त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द महत्त्वाचा होता आणि नागरिक शांत राहिले होते. आता त्यात गती मंदावली असल्याचे दिसत आहे असंही त्यांनी सांगितले आहे.

त्यांनी यावेळी क्रूर कृत्य करणारे आरोपी बाहेर फिरत आहेत आणि कृष्णा आंधळे अद्याप सापडत नसल्याची खंतही व्यक्त केली. हत्या करताना आंधळे व्हिडिओ कॉलवर होता, तो पकडला तर मोठा उलगडा होईल, असे त्यांनी नमूद केले.

राज्य विधानसभेच्या अधिवेशनातही या प्रकरणाचा उल्लेख झाल्याचे सांगत त्यांनी सरकारने या केसचा निकाल चार ते पाच महिन्यांत निघावा अशी मागणी केली.

अशा लोकांना संरक्षण दिले तर आम्हाला अजित पवारांवर राग येणारच. चुकीच्या व्यक्तीला जवळ करण्याचे पाप करू नका, अशी टीका त्यांनी केली.

### बोगस खत विक्री करणाऱ्या कंपनी

भागीरथी के. यांना भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता. त्यांनी सांगीतले की शिवाजी ॲग्रो क्रॉप सायन्स जालना चा परवाना करार रदद करणेबाबत दि.४/०२/२०२५ रोजी मा. कृषि संचालक (नि.गुनि.)यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्पादन व पुरवठा केला नाही. याबाबत वितरक कंपनीचे संचालक निखिल कासोळे यांना भ्रमणध्वनीद्वारे कृषि केंद्र चालक प्रतिनिधी राधेशाम काकडे यांनी विक्री केंद्रात बोलावून घेतले. निखिल कासोळे यांना सदरील खत कृषि गौरव फर्टिलायझर ता.नेवासा,जि.अहमदनगर यांचेकडून सिलीकॉन खत या नावाने खरेदी करून ते खत १०:२०:२० व २०:२०:०० या खताच्या बॅग भरून मे. काव्या ॲग्रो गेवराई यांना दुकानदारास दिले याबाबत लेखी खुलासा दिला.

यानिमित्ताने जिल्ह्यात कुठेही विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

### शिकायला शाळेत या अन्

आरोग्य, सुरक्षितता व प्रतिष्ठेची हमी असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मात्र, प्रत्यक्षात काय? अभियान फक्त कागदोपत्रीच राबवलं जात असल्याचं वास्तव पुन्हा समोर आलंय.

**कोंबड वस्ती शाळेची शौचालये अनेक वर्षांपासूनच बंद**

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील लिंबागणेश केंद्राखालील कोंबड वस्ती जिल्हा परिषद शाळेतील शौचालय अनेक वर्षांपासून बंद असून, पूर्णपणे निकामी आहेत. परिणामी, विद्यार्थ्यांना शौचालयासाठी सरांची परवानगी घेऊन घरी जावं लागतं. अभियानाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे १० डिसेंबरला 'उत्तम शौचालय पुरस्कार' जाहीर होणार आहे. अस्तित्वात नसलेल्या सुविधांची चमकदार कागदी नोंद मात्र व्यवस्थित तयार आहे. कागदोपत्रीच अभियान राबवल्याबद्दल सर्वात उत्कृष्ट पुरस्कार तर सीईओ जितीन रहमान यांच्याच गळ्यात टाका, अशी तिखट प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी दिली. तसंच त्यांनी संतापही व्यक्त केला.

# तरुणीचा मृत्यू फास घेतल्यामुळेच झाला; फलटणमध्ये आयुष्य संपवलेल्या डॉ.तरुणीच्या मृत्यूबाबत फडणवीसांकडून महत्त्वाची माहिती

नागपूर । प्रतिनिधी

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर तरुणीचा मृत्यू हा गळा दाबून झालेला नाही. तिने गळफास घेतल्यामुळेच तिचा मृत्यू झाल्याचे फॉरेन्सिक रिपोर्टमधून निष्पन्न झाल्याचे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते मंगळवारी विधानसभेतील चर्चेदरम्यान बोलत होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्याप्रकरणाविषयी सविस्तर भाष्य केले. फॉरेन्सिक रिपोर्टमध्ये दोन गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. एक म्हणजे या तरुणीच्या हातावर जो मजकूर लिहला होता, ते हस्ताक्षर तिचेच आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या तरुणीचा मृत्यू फास घेतल्यामुळेच झाला आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



या प्रकरणातील आरोपी पोलीस अधिकारी गोपाळ बदने याने तरुणीची फसवणूक करुन तिचे शारीरिक शोषण केले. मोबाईलमधील चॅटसमधून ही गोष्ट समोर आली आहे. गोपाळ बदने याने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवले होते. पण नंतर त्याने वेगळी भूमिका घेतली. त्यामुळे तरुणीने सुसाईड नोटमध्ये गोपाळ बदने आणि आणखी एका तरुणाचे नाव लिहले होते. एकीकडे बदने तिची फसवणूक करुन तिचे शारीरिक शोषण करत होता. तर दुसरीकडे दुसऱ्या तरुणानेही परिस्थितीचा फायदा घेऊन डॉक्टर तरुणीची फसवणूक केली. त्यामुळे तिने या दोघांची नावं लिहून आत्महत्या केली. तिचा मृत्यू गळा दाबून झालेला नाही, तर गळफास लागल्यामुळेच झाला आहे. याप्रकरणाचा तपास अजून संपलेला नाही. मात्र, आता याप्रकरणात आरोपपत्र दाखल केले जाईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

ही तरुणी फलटण उपजिल्हा रुग्णालयात मेडिकल ऑफिसर होती. एखाद्या आरोपीला अटक करताना तो अटकेसाठी फिट आहे की नाही, यासाठी वैद्यकीय अहवाल घ्यावा लागतो. या डॉक्टर तरुणीने काही आरोपी अनफिट असल्याचे रिपोर्ट दिले होते. त्यामुळे पोलिसांनी तिच्या वरिष्ठांना पत्र लिहले होते. यामध्ये त्यांनी सांगितले होते की, संबंधित आरोपी हे मोठ्या गुन्ह्यात पकडण्यात आले आहेत. त्यांना अनफिट प्रमाणपत्र दिले जात आहे. याची चौकशीही झाली. हे सर्व पाच महिने आधी घडले होते. त्यामुळे पोलिसांच्या दबावाचा आणि आत्महत्येचा संबंध नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# आ. रोहित पवार यांच्याविरुद्ध हक्कभंगाची कारवाईची मागणी

नागपूर । प्रतिनिधी

विधानपरिषदेत झालेल्या घडामोडींमुळे राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे नेते रोहित पवार यांच्याभोवती राजकीय वादळ तयार झालं आहे. सभागृहात भाजपचे प्रविण दरेकर यांनी त्यांच्याविरुद्ध हक्कभंगाची कारवाई मागितल्यानंतर वातावरण अधिक तापलं.

जामखेड येथील एका प्रचारसभेत रोहित पवार यांच्या उपस्थितीत पक्षाचे स्थानिक पदाधिकारी सूर्यकांत मोरे यांनी सभागृह आणि सभापतींबद्दल केलेल्या वक्तव्यांमुळे ही संपूर्ण घटना धगधगू लागली.

दरेकर यांनी सभागृहात बोलताना मोरे यांच्या भाषणात विधानपरिषद, सभापती तसेच सदस्यांच्या पदाचा अवमान झाल्याचा आरोप केला. सभागृहाच्या रचनेवर, सदस्यांच्या ओळखपत्रांवर आणि अध्यक्षांच्या भूमिकेवर करण्यात आलेली टिप्पणी ही संसदीय परंपरेला घाव घालणारी असल्याचे ते म्हणाले. या विधानावेळी रोहित पवार तसेच काही इतर नेते उपस्थित होते, परंतु त्यांनी आक्षेप न घेतल्याने या प्रकरणाला अधिक वळण मिळालं, असा दावा दरेकरांनी केला.

घडलेल्या घटनेचे व्हिडिओ क्लिप्स सभागृहाला देण्यात येणार असल्याचे सांगत दरेकरांनी कारवाईची मागणी तीव्र केली. समाजात चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून हा मुद्दा हलक्यात घेऊ नये, अशी त्यांची भूमिका होती.

दरम्यान, हक्कभंगाचा प्रस्ताव पुढे गेला तर त्यानुसार पुढील प्रक्रियेत सदस्यत्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. त्यामुळे रोहित पवारांच्या आमदारकीवर संभाव्य परिणामांची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

या सर्व वादाच्या केंद्रस्थानी असलेले सूर्यकांत मोरे हे जामखेड तालुक्यातील रत्नापूर येथील असून, त्यांच्या वक्तव्यावर विधान परिषद सचिवालयाने नोटीस पाठवली आहे. त्यांना निश्चित मुदतीत स्पष्टीकरण देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि प्रकरणाची सुनावणी सभापती राम शिंदे यांच्या समोर होणार आहे.

# जलसंधारण विभागातील प्रकल्पांबाबत प्राप्त तक्रारींची विशेष तपास पथकामार्फत चौकशी-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर । प्रतिनिधी**

जलसंधारण विभागांतर्गत राज्यात विविध प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या प्रकल्पांमधील काही प्रकल्पांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानुसार या प्रकरणाशी संबंधित विभागातील अधिकारी सुनील कुशिरे यांची वाल्मी या संस्थेत बदली करण्यात आली असून २००८ ते २०१४ या कालावधीतील प्रकल्पांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरू असल्याची माहिती जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधान परिषदेत दिली. यासंदर्भात विधान परिषद सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येईल आणि त्याचा अहवाल दोन महिन्यात सादर केला जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.




सदस्य ड. अनिल परब यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील, शशिकांत शिंदे आदींनी सहभाग घेतला.

या बाबत अधिक माहिती देताना जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले, मे. वॉटरफ्रंन्ट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने निविदा भरताना वाहनाची खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आरसी बुक दाखल केलेली होती. विभागामार्फत रत्नागिरी शहर पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. सद्यस्थितीत पोलीस तपासाअंती कोर्टात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे. या कंपनीच्या २००८ ते २०१४ या कालावधीतील राज्यातील प्रकल्पांची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सुरु आहे. या कंपनीला मंजूर करण्यात आलेल्या मौजे सारंगवाडी, ता. चिखली, जि. बुलढाणा संग्राहक तलाव व पुरसंरक्षक योजनांच्या प्रकल्पाची कार्यकारी अभियंता, गुणनियंत्रण विभाग, अकोला यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून बहुतांश घटकांची कामे सर्वसाधारणपणे योग्य प्रकारे करण्यात आल्याचे दिसून आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

# प्रत्येक समस्येला लाडक्या बहिणीशी जोडू नका, नाहीतर घरी बसावे लागेल, मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा

**नागपूर । प्रतिनिधी**

- राज्यातील प्रत्येक समस्येला लाडकी बहिण योजनेशी जोडणे योग्य ठरणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. लाडकी बहिण योजना सुरूच राहणार असून ती कोणीही बंद करू शकणार नाही.



तुम्ही प्रत्येक मुद्द्यावर लाडकी बहिण योजनेला जोडणे बंद करा, नाहीतर तुम्हाला घरी बसावे लागेल., असा इशाराही त्यांनी यावेळी सदस्यांना दिला.

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात अवैध गुटख्याविरोधात सुरू असलेल्या कारवाईवर चर्चा सुरू होती. या चर्चेत सहभागी होताना भाजपचे अभिमन्यु पवार म्हणाले की, अवैध दारूच्या वाहतुकीवरही कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. ही संपूर्ण राज्यातील समस्या आहे. या समस्येमुळे लाडकी बहिणी प्रभावित होत आहेत. ही एक सामाजिक समस्या आहे. या संदर्भात अध्यक्षांनी राज्य सरकारला कारवाई करण्याचे निर्देश दिले होते, तरीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे लाडकी बहिणींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य सरकार अवैध दारूविरुद्धही कठोर कारवाई करत आहे आणि कारवाई अधिक वेगाने करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात येतील.

# देशातील सर्व खासगी आणि सरकारी शाळांमध्ये क्रीडा शिक्षण अनिवार्य होणार, खा.धनंजय महाडिकांकडून संसदेत विधेयक सादर

नवी दिल्ली । वृत्तसेवा

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात खासदार धनंजय महाडिक यांनी एक महत्त्वाचे विधेयक सादर केले आहे, ज्यामुळे देशातील प्रत्येक खासगी आणि सरकारी शाळांमध्ये प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावर क्रीडा शिक्षण अनिवार्य होणार आहे.

या विधेयकानुसार प्रत्येक शाळेमध्ये खेळ आणि खेळाडूंना प्रोत्साहन देणाऱ्या मूलभूत पायाभूत सुविधांचा समावेश करणे ही अत्यंत गरजेची बाब होणार आहे.

विशेषतः देशातील शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या संवर्धनासाठी हे पाऊल महत्वाचे मानले जात आहे. क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी मैदान, आवश्यक खेळ सामग्री, प्रशिक्षक



आणि इतर सुविधा उपलब्ध करणे या विषयांवरही या विधेयकात भर देण्यात आला आहे. या नव्या नियमांमुळे लहान मुलांपासून तरुणांपर्यंत खेळातील समृद्धी वाढेल आणि शालेय स्तरावर खेळाडूंची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढेची शक्यता आहे.

खासदार धनंजय महाडिक यांच्या म्हणण्यानुसार, या विधेयकामुळे देशभरातून नव्याने अनेक क्रीडापटू तयार होऊन भारताचा आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात दबदबा अधिक मजबूत होऊ शकतो. तसेच, विद्यार्थ्यांचा शारीरिक व मानसिक विकास होईल आणि हा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी मोठा टप्पा ठरणार आहे. या विधेयकाच्या पक्षात अनेक मान्यवर आणि शिक्षणतज्ज्ञांनीही अभिप्राय दिला असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी सरकारने लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचा इरादा व्यक्त केला आहे.

यामुळे शिक्षण क्षेत्रात क्रीडा शिक्षणाला नव्या उंचीवर नेण्याचा मानस असून, आगामी काळात शालेय विद्यार्थ्यांमध्ये खेळाचे महत्त्व अधिक वाढेल, असा विश्वास वर्ल्ड क्रिकेट, हॉकी, आणि अन्य खेळाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# राज्यात ६०४ आपला दवाखाने सुरू; उर्वरित ९६ दवाखाने जानेवारी अखेर सुरू होणार

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**नागपूर । प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाच्या माध्यमातून सर्व सामान्य माणसाला आरोग्याच्या सर्व सुविधा तत्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ही योजना अधिक व्यापकपणे राबविण्यात येईल. राज्यात सध्या या योजनेंतर्गत ६०४ आपला दवाखाने सुरू असून उर्वरित ९६ दवाखाने येत्या जानेवारी अखेर सुरू करण्यात येतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत दिली.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व आरोग्य वर्धिनी केंद्र राज्यात पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत सदस्य प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री अभिजीत वंजारी, सचिन अहिर, प्रसाद लाड, परिणय फुके, निरंजन डावखरे, रणजितसिंह मोहिते, राजहंस सिंह, शशिकांत शिंदे, श्रीमती उमा खापरे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

सर्वसामान्य व गरीब नागरिकांसाठी असल्याने ती अधिक प्रभावी आणि गतिमान करण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय करण्याचा शासनाचा निर्धार असल्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.

मंत्री आबिटकर म्हणाले, राज्य शासनामार्फत ७०० हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व केंद्र शासनाच्या १५ वित्त आयोगाच्या निधीतून २,२३२ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला. यापैकी ६०४ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व १,६४३ नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र सुरू करण्यात आली आहेत.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, राज्यात सुरू असलेल्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व नागरी आरोग्य वर्धिनी केंद्राची संबंधित जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत देखरेख केली जात आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मध्ये फार्मसिस्ट नियुक्तीबाबत केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.

# सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही; २०२९ मध्ये भाजपा विरुद्ध सर्वपक्षीय लढत दिसणार-रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावरून आज (९ डिसेंबर) हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधकांकडून जोरदार आंदोलन करण्यात आलं. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना विचारलं आलं. यावेळी ते म्हणाले की, सरकार कुठंही काहीही करणार नाही. शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी देण्यात यावे, अशी मागणी आम्ही केली होती. मात्र शेतकऱ्यांना फक्त ६ हजार मिळाले आहेत. तसंच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीला धक्का लागू नये म्हणून फक्त घोषणा करण्यात आली. सरकार फक्त लोकसभा तसंच विधानसभेच्या अगोदर कर्जमाफी देईल. तोपर्यंत कितीही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली तरी शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार नाही, असं म्हणत रोहित पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला.

**लोकशाही टिकवण्यासाठी विरोधी पक्षनेता हे पद हवं**

पुण्यात काल ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांचं निधन झालं. त्यांच्या पार्थिवाचं दर्शन घेण्यासाठी आज आमदार रोहित पवार पुण्यात आले होते. यावेळी रोहित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला असता त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. दरम्यान, विरोधी पक्षनेते पदाच्याबाबत रोहित पवार यांना विचारलं असता, त्यांनी सांगितलं की, विरोधी पक्षनेता असावं, हे सामान्य लोकांसाठी खूप महत्त्वाचं आहे. आम्ही विरोधी पक्षाची मागणी करत आहोत. मात्र सरकार निर्णय घेत नाही. विरोधी पक्षनेते पदाची परंपरा बदलण्याची जर भाषा होत असेल तर ते अत्यंत चुकीचं आहे. विरोधी पक्षनेता हे पद संवैधानिक असून लोकशाही टिकवण्यासाठी हे खूप महत्त्वाचं आहे आणि ही सरकारची जबाबदारी आहे, असं रोहित पवार यांनी सांगितलं.




**२०२९ मध्ये भाजपा विरुद्ध सर्वपक्षीय लढत दिसणार**

याचबरोबर, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या महायुतीत जागा वाटपाबाबत चर्चा सुरू असल्याचं समजतं. याबाबत रोहित पवार यांनी भाष्य केलं. ते म्हणाले की, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी एकनाथ शिंदे यांचा पक्ष फक्त भाजपाला हवा आहे. बाकी कुठंही तिन्ही पक्षांची युती होईल, असं दिसत नाही. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांचं महत्त्व काही दिवस असणार आहे. त्यानंतर २०२९ मध्ये भाजपा विरुद्ध सर्वपक्षीय लढत दिसणार आहे, असं यावेळी रोहित पवार यांनी सांगितलं. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. याबाबत रोहित पवार म्हणाले की, गेली ३ वर्ष ही चर्चा फक्त सुरूच आहे. आता ही चर्चा थांबली पाहिजे. माझ्या मतदारसंघात आम्ही भाजपाविरोधात लढलो. तसंच अजित पवार यांच्याविरोधात देखील लढलो होतो. आम्ही त्यांच्याविरोधात जर लढत असू तर एक येण्याची चर्चा ही फक्त चर्चा आहे, असं रोहित पवार म्हणाले.

# ...तर हा बलात्काराचा प्रयत्न नाही; अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सुप्रीम कोर्टाची नाराजी

अलहाबाद । वृत्तसेवा

गेल्या काही दिवसांत महाराष्ट्रातून महिला अत्याचाराच्या १४ घटना समोर आल्या आहेत, अशातच अल्पवयीन मुलीच्या संदर्भात अलहाबाद उच्च न्यायालयाने एक निर्णय दिला आहे. त्या निर्णयावर मात्र सुप्रीम कोर्टाने नाराजी व्यक्त केली आहे. अल्पवयीन मुलीचे स्तन पकडून नेणे, तिच्या पायजम्याची दोरी तोडणे, तिचे कपडे काढण्याचा प्रयत्न करणे आणि तिला नाल्याखाली ओढण्याचा प्रयत्न करणे हे बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न नाही, असं अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणात महत्त्वाचा निकाल देत हे विधान केलंय. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध स्व-मोटो याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवल आहे.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर खटल्याच्या सुनावणीदरम्यान, वकिलांनी निदर्शनास आणून दिले की, या प्रकरणाव्यतिरिक्त अनेक उच्च न्यायालयांनी अलीकडेच लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये अशाच तोंडी आणि लेखी टिप्पण्या दिल्या आहेत. ज्येष्ठ वकील शोभा गुप्ता यांनी खंडपीठाला सांगितले की, अलिकडच्याच एका प्रकरणात, अलाहाबाद उच्च न्यायालयाने असे म्हटले होते की, रात्रीची वेळ असल्याने, ते आरोपींसाठी आमंत्रण होते. त्यांनी कोलकत्ता आणि राजस्थान उच्च न्यायालयांमधील अशाच प्रकारच्या प्रकरणांचाही उल्लेख केला. दुसऱ्या वकिलाने खंडपीठाला जिल्हा न्यायालयातील एका खटल्याचा संदर्भ दिला जिथे न्यायालयीन कामकाज कॅमेऱ्याच्या समोर असूनही, अनेक लोक उपस्थित होते आणि सुनावणीदरम्यान पीडितेचा छळ करण्यात आल्याचा आरोप आहे.

**अशा टिप्पण्यांचा समाजावर नकारात्मक परिणाम**

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, जर तुम्ही या सर्व प्रकरणांचा उल्लेख करू शकत असाल तर आम्ही व्यापक मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचा विचार करू शकतो. त्यांनी पुढे म्हटले की, अशा कोणत्याही असंवेदनशील टिप्पण्यांचा आणि न्यायालयीन टिप्पण्यांचा पीडितांवर, त्यांच्या कुटुंबांवर आणि संपूर्ण समाजावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

हे पीडितांना जबरदस्ती करण्याच्या पद्धती आहेत. शिवाय कधीकधी, अशा पद्धतींचा वापर त्यांना त्यांच्या तक्रारी मागे घेण्यास भाग पाडण्यासाठी केला जातो. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, हे उच्च न्यायालयाचे निरीक्षण होते आणि जिल्हा न्यायालयाच्या पातळीवर ते विचारात घेतले जाऊ नयेत आणि आम्ही मार्गदर्शक तत्त्वे जारी करू इच्छितो. खंडपीठाने वकिलांना पुढील सुनावणीच्या तारखेपूर्वी संक्षिप्त लेखी सूचना सादर करण्यास सांगितले.

**नेमकं प्रकरण काय?**

१० नोव्हेंबर २०२१ रोजी संध्याकाळी ५ वाजता उत्तर प्रदेशातील कासगंज जिल्ह्यातील पटियाली पोलीस स्टेशन परिसरात हीच घटना घडली. यामध्ये एका महिलेने पोलीसात तक्रार दाखल केली होती. यामध्ये ती म्हणते, 'मी माझ्या १४ वर्षांच्या मुलीसोबत कुठेतरी जात असताना, पवन, आकाश आणि अशोक नावाच्या तीन तरुणांनी मुलीला घरी सोडण्याच्या बहाण्याने त्यांच्या दुचाकीवर बसवले. आरोपीने वाटेत एका कल्व्हर्टजवळ गाडी थांबवली आणि मुलीचे स्तन पकडून तिच्या पायजम्याची दोरी तोडली. त्यानंतर चुकीच्या हेतूने त्यांनी तिला नाल्याखाली ओढायला सुरुवात केली. मुलीने केलेला आरडोओरडा ऐकून तिथे लोकांची गर्दी जमली आणि आरोपी माझ्या मुलीला घटनास्थळी सोडून पळून गेला, असे महिलेने एफआयआरमध्ये म्हटले आहे. या प्रकरणात आरोपीविरुद्ध बलात्कारासाठी भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ आणि गुन्हा करण्याचा प्रयत्न करण्यासाठी पोक्सो कायद्याच्या कलम १८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कनिष्ठ न्यायालयाने या कलमांखाली आरोपींविरुद्ध समन्स जारी केले.

पाटोदा संचार | जिल्हा विशेष | बुधवार दि. १० डिसेंबर २०२५ | ४

# डॉ.गौरी पालवे यांना न्याय द्यावा

## डॉक्टर व सामाजिक संघटनेच्या वतीने मुख्यमंत्र्याकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. गौरी पालवे यांची ही आत्महत्या नसून ही हत्याच आहे याच दृष्टीने सुसंगत तपास व्हावा,सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी, पुढील तपास दबाव विरहित सुसंगत नि:पक्षपाती पणे व्हावा, कुटुंबाला तात्काळ पोलीस संरक्षण देण्यात यावे, आरोपीच्या विवाहबाह्य संबंधातील किरण सिद्धार्थ इंगळे हिची कसून तपासणी व्हावी, डॉ. गौरी पालवे यांची ननंद शितल भगवान गर्जे रा. नारायणगाव ता. जुन्नर जि. नाशिक, तसेच आरोपीचा भाऊ अजय भगवान गर्जे रा. म्हाडा, वरळी, मुंबई. यांना अटक करून, सह आरोपी करून त्यांची कसून तपासणी करण्यात यावी अशी मागणी विविध संघटना, सामाजिक संघटना व सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने डॉ. साक्षी जोगदंड यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

डॉ. गौरी अशोक पालवे यांचा रा. म्हाडा, वरळी, मुंबई येथे संशयास्पद मृत्यू झाला होता. अद्याप कुठल्याही पोलीस तपासणी निकषाद्वारे ही आत्महत्या होती असे निष्पन्न होऊ शकले नाही. घटनास्थळी आरोपींनी आत्महत्तेचा बनाव निर्माण केलेला दिसून येतो. आरोपीकडे घराच्या चाव्या असतानाही



फाशीचा बेबनाव केलेला दिसून येत आहे. मयत डॉ. गौरी यांच्या अंगावर असंख्य जखमा दिसून आलेल्या आहेत. पोलीसांनी नोंदविलेल्या जवाबांमध्ये विसंगती दिसुन येते, त्यामुळे पोलीस तपासामध्ये प्रचंड विसंगती निर्माण झाली आहे व जाणीवपूर्वक तपास दिशाहीन होताना दिसत आहे. या घटनेतील फिर्यादीमध्ये नमुद केल्याप्रमाणे काही आरोपी मोकाट आहेत. त्यांना तात्काळ अटक करणे गरजेचे आहे. याचा पिडीत कुटुंबावरही मोठ्या प्रमाणात दबाव येत आहे. या अनुषंगाने कुटुंबीयांना संरक्षण देणे गरजेचे आहे. तरी ते तात्काळ देण्यात यावे. यापुढील तपास विसंगती विरहीत, कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता, नि:पक्षपणे करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

या वेळी इंडियन डेंटल असोसिएशनच्या सदस्य डॉ. मंगेश अंधारे, आय एम ए चे जिल्हाध्यक्ष डॉ.अनंत मुळे,आय एम ए चे जिल्हा सचिव डॉ. अमोल गीते, नॅचरोपॅथी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष डॉ.संजय तांदळे, नॅशनल हेल्थ मिशन चे जिल्हा समन्वयक किशोर चव्हाण, नर्सेस फेडरेशन च्या जिल्हा अध्यक्ष शीला मुंडे,बी.डी.एस. संघटनेचे सदस्य डॉ. अशोक सानप, मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य कॉ.डी.जी. तांदळे, मराठवाडा शिक्षक संघाचे निमंत्रण राजकुमार कदम, महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बाबा बडे, सरचिटणीस रामचंद्र ठोसर, उपाध्यक्ष एस पी जगताप, बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये, सेवानिवृत्त ईपीएस कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष सुदाम कोळेकर, उपाध्यक्ष रमाकांत मुळे, एकल महिला संघटनेच्या अध्यक्ष शिल्पा पंडित, शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, प्रवीण प्रशिक्षक डॉ.लक्ष्मण पवळ, बाजीराव ढाकणे, चौसाळा येथील मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागनाथ वाघमारे,सिद्धार्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. साक्षी जोगदंड, सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे जिल्हाध्यक्ष एस. सी. तांदळे, डी. वाय.एफ.आय. युवा संघटनेचे जिल्हा कोषाध्यक्ष कॉ. जायभाये, बीड शहर बचाव मंचचे कायदेशीर सल्लागारड. अनिल बारगजे, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश ढवळे, राष्ट्रीय कामगार कॉंग्रेस इंटक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, सामाजिक कार्यकर्ते तानाजी थोरात आदींची उपस्थिती होती.

# लिंबागणेश परिसरात बिबट्यांची वाढती हालचाल; शेतकरी भयभीत

## कृषी पंपासाठी दिवसा विद्युतपुरवठ्याची मागणी ; गुरुवारी रास्तारोको आंदोलनाची चेतावणी–डॉ. ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने ग्रामस्थ व शेतकरी भयभीत झाले आहेत. रात्रीच्या वेळी कृषी पंपांचे विद्युतपुरवठा सुरू असल्याने शेतकऱ्यांना अंधारात शेतात जावे लागते आणि त्यामुळे त्यांच्या जिवीतास गंभीर धोका निर्माण झाला आहे.



या पार्श्वभूमीवर कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा नियमित विद्युतपुरवठा सुरू करावा, या मुख्य मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ११ डिसेंबर, गुरुवार रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची लेखी नोटीस जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता महावितरण बीड व सहाय्यक अभियंता उपकेंद्र लिंबागणेश यांना देण्यात आली आहे.

पोखरी व पिंपरनई परिसरातील शेतकऱ्यांनी बिबट्यांचा वावर वाढल्याची माहिती दिल्याने भीतीचे वातावरण अधिक गडद झाले आहे. जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यात पूर्वीही शेतकरी व ग्रामस्थ मृत्युमुखी पडल्याच्या घटना झाल्या असल्याने या परिस्थितीकडे दुर्लक्ष धोकादायक ठरू शकते.

लिंबागणेश, पिंपरनई, पोखरी, बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी, मोरगाव, फुकेवाडी, काळेवाडी व गणेशनगर या भागांमध्ये रात्रीचा विद्युतपुरवठा थांबवून दिवसा नियमित व पुरेसा पुरवठा द्यावा, अशी ठाम मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# ऊस दरावरुन संघर्ष समिती गंगाखेड शुगरवर धडकली

## मागण्याच्या मान्य न झाल्यास रस्ता रोको आंदोलन

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यासह सोनपेठ, गंगाखेड परिसरातील असंख्य शेतकऱ्यांचा ऊस गाळप करण्याऱ्या गंगाखेड येथील जी ७ साखर कारखानाण्याने सुरू असलेल्या गळीत हंगामात पहिली उचल ३ हजार व अंतिम भाव ४ हजार रु देण्यात यावा याकरिता संघर्ष समितीने कारखाना संचालक मंडळांची भेट देत आपले निवेदन दिले. मागण्याबाबत योग्य विचार न झाल्यास दि १५ डिसेंबर पासून रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा ही यावेळी देण्यात आला.

वाढती महागाई, खते व निविष्ठा दरवाढ यामुळे उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने (उ-उढ) १०.२५ उताऱ्यावर २६८०रू. प्रतिटन उत्पादन खर्च जाहीर केला आहे. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार ऊसदर ४००० रु पेक्षा जास्त मिळायला हवा. रंगराजन समीतीच्या शिफारशीनुसार ऊसा पासून निर्माण होणाऱ्या उप पदार्थाच्या उत्पादनाचा रेव्हेन्यू शेअरींग फार्मूला प्रमाणे त्यात भर पडणे अपेक्षित आहे. सदर बाबी लक्षात घेता ऊसाला किमान प्रति टन ३००० रूपये एक रक्कमी पहिली उचल तर चार हजार रूपये अंतिम दर देण्यात यावा या मागणीला ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने दुसऱ्यांदा सोमवार दि ८ रोजी कार्यकारी अधिकारी यांची भेट घेत निवेदन दिले. मराठवाडा विभागातील जवळपास सर्वच साखर कारखान्यांनी पहिली उचल जाहीर केली आहे. त्याप्रमाणे आपणही पहिली उचल जाहीर करुन शेतकऱ्यांना आश्वस्त करावे अन्यथा आपल्या कारखाना प्रशासना विरोधात कोयता बंद आंदोलन व दि १५ डिसेंबर रोजी परळी नाका, गंगारखेड था चौकात रस्ता रोको आंदोलन करण्यात येइल असा इशारा यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी संघर्ष समितीचे कॉ.एड.माधुरी क्षिरसागर कॉ अजय बुरांडे सुनिल पौळ, गोटू जाधव,कॉ.ओंकार पवार, रामेश्वर मोकाशी, सुभाष कदम, कॉ.शिवाजी कदम, श्रीकांत भोसले, गोपीनाथ भोसले, भगवान शिदे, व्यंकटराव भोसले आदींसह संघर्ष समितीचे इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# दोन लाखांत लग्न, सासरी येताच तीन तासांतच नवरी पळाली; नातेवाइकांनी बसस्टँडवर पकडली

केज । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील एका तरुणाची लग्नाच्या नावाखाली तब्बल १ लाख ९० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दीपेवडगाव येथील हनुमान मंदिरात लग्न लावलेली नवरीबाई, कोद्री येथे सासरी आल्यानंतर अवघ्या तीन तासांतच पळून जाण्याचा प्रयत्न करताना ग्रामस्थांनी पकडल्यामुळे या बनावट लग्नाच्या खेळाचा पर्दाफाश झाला आहे.

याप्रकरणी नवरीसह चार आरोपींविरुद्ध युसूफवडगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**२ लाखांत लग्न ठरले, मंदिरात बांधली गाठ**

अंबाजोगाई तालुक्यातील कोद्री येथील नागेश देविदास जगताप (वय ३६) या तरुणाचे लग्न लावून देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे राहणाऱ्या प्रल्हाद गुळभीले या एजंटाने मध्यस्थी केली होती. एजंट प्रल्हाद गुळभीले याने नागेश जगताप यांच्याकडून १ लाख ९० हजार रुपये घेतले. ६ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजता दीपेवडगाव येथील हनुमान मंदिरात नागेश जगताप आणि प्रीती शिवाजी राऊत यांचा विवाह लावण्यात आला.

सासरला पोहोचताच फरार होण्याचा डाव

लग्न पार पडल्यानंतर वधू-वरासह सर्व नातेवाईक कोद्री येथे नागेश यांच्या घरी आले. सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास, म्हणजेच लग्नानंतर अवघ्या तीन तासांतच, नववधू प्रीती राऊत हिने शौचाला जाण्याच्या बहाण्याने घरातून पळून जाण्याचा प्रयत्न केला. गावातील एका नागरिकाला ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने नागेश जगताप आणि त्यांच्या नातेवाईकांना माहिती दिली. नातेवाईकांनी तिचा शोध घेतला असता, प्रीती राऊत ही डिघोळअंबा बस स्थानकाजवळ मिळून आली.

चार जणांविरोधात गुन्हा दाखल

पळून जाण्याचं कारण विचारल्यावर प्रीती राऊतने साथीदारांसोबत मिळून फसवणूक केल्याची कबुली दिली. त्यानंतर नागेश जगताप यांच्या फिर्यादीवरून एजंट प्रल्हाद गुळभीले, नवरी प्रीती शिवाजी राऊत, तिची मावशी सविता (रा. पुणे) आणि माया राऊत (रा. चाकण, पुणे) या चौघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**नोटरीसह अनेकजण चौकशीच्या फेऱ्यात**

पोलिसांनी नववधू प्रीती राऊत हिला अटक करून केज न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिला १० डिसेंबरपर्यंत ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात केवळ नवरी आणि एजंटच नव्हे, तर लग्नाआधीच पतिकडील नावाचे बनावट आधारकार्ड तयार करणारे संगणक तंत्रज्ञ आणि केज येथील नोटरी करून देणारे व्यक्तीही चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत.

# ओंकार साखर कारखान्याकडून प्रति मे.टन ३०५० दर घोषित

परळी । प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या संकल्पनेतून उभारलेला वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना आता रूपांतरित होऊन ओंकार साखर कारखाना (युनिट क्र. ८, पांगरी) या नावाने कार्यरत आहे. कारखान्याच्या २०२५-२६ गळीत हंगामासाठीचा ऊस दर जाहीर करण्यात आला असून, प्रति मेट्रिक टन ३०५० रुपये असा आकर्षक दर घोषित करण्यात आला आहे.

आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही अधिकृत घोषणा कारखाना प्रशासनाने केली. पहिला आणि दुसरा हप्ता जाहीर चेअरमन बाबुराव बोथरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चित केलेल्या दरानुसार प्रति मे.टन ३०५० रु. अधिकृत दर पहिला हप्ता : २९५० रु. प्रति मे.टन दीपावलीसाठी अतिरिक्त १०० रु. प्रति मे.टन कारखाना व्यवस्थापनाच्या निर्णयामुळे यंदाच्या हंगामात पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

हंगामी दरातील स्थैर्य, वेळेवर आर्थिक तरतूद आणि उत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिलेले बोनस लाभ यामुळे या वर्षी शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हंगाम २०२५-२६ मध्ये ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना टनेजनुसार मोफत साखर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जनरल मॅनेजर वैभव व्ही. काशीद यांनी दिली. दिवाळीपूर्वी हा लाभशेतकऱ्यांना मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कारखान्याचा शेतकऱ्यांवर विश्वास कायम**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे सातत्यपूर्ण सहकार्य आणि विश्वास हेच आमचे बळ आहे. पुढेही शेतकरी हिताचाच विचार करून सर्वोत्तम निर्णय घेण्यास कारखाना कटिबद्ध राहील, अशी ग्वाही ओंकार साखर कारखाना प्रशासनाने दिली.

# आमदार अमित गोरखे यांना सभापती केल्याने मातंग समाजाचा मान वाढला

## सामाजिक कार्यकर्ते योगेश अडागळे

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या अनेक विविध प्रकारच्या घडामोडी घडतताना दिसून येत आहेत नुकत्याच विधानपरिषदेवर घेतलेल्या आमदार अमित गोरखे यांना राज्य सरकारने विधानपरिषदेत तालिका सभापती पद पद देऊन मातंग समाजाला सन्मानाचे स्थान दिल्याबद्दल समाज बांधवांच्या वतीने सरकारचे आभार सामाजिक कार्यकर्ते योगेश अडागळे यांनी मानले आहेत.



आमदार गोरखे यांच्या माध्यमातून समाजाला एक उच्चशिक्षित आमदार लाभला याबद्दल समाजामध्ये उत्साहाचे वातावरण व समाजाला एक दिशा देणारा नेता म्हणून समाजवर्ग यांच्याकडे पाहत आहे. तरुण पिढीला दिशा देणारा नेता म्हणून सध्या तरुण पिढी गोरखे यांच्या कडे आदर्श युवा आमदार म्हणून पाहत आहे व मातंग समाजातील सुशिक्षित मुलं राजकारणाकडे कशी वळतील याचं आदर्श उदाहरण म्हणजेच अमित गोरखे आहेत. म्हणून गोरखे यांच्या पाठीमागे ठामपणे उभा राहण्याचा निर्धार सामाजिक कार्यकर्ते योगेश अडागळे यांनी केला आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या प्रारंभी महाराष्ट्र विधान परिषदेच्या तालिका सभापती पदी आमदार अमित गोरखे यांची निवड जाहीर झाली सरांच्या प्रामाणिक कामाला, अभ्यासू वृत्तीला आणि सर्वसामान्यांशी असलेल्या नात्याला मिळालेला हा सन्मान आमच्या सारख्या कार्यकर्त्यांसाठी मोठा अभिमानाचा क्षण आहे. नेहमी जिद्दीने आणि नम्रतेने वाटचाल करणाऱ्या सरांना शुभेच्छा समाजाच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते योगेश अडागळे यांनी दिल्या

# कै. डॉ. श्रीहरी लहाने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रोटरी क्लबच्या मुळव्याध, भगंदर शिबिरासाठी अहमदाबाद येथील सुप्रसिद्ध डॉ. देवेंद्र शहा येणार

बीड । प्रतिनिधी

येथील कै. डॉ. श्रीहरी लहाने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रोटरी क्लब बीड व विठाई हॉस्पिटल जालना रोड, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०३ शनिवार, ०४ रविवार, ०५ सोमवार २०२५ (सकाळी १० ते संध्याकाळी ६.०० पर्यत ) दरम्यान तीन दिवसीय मुळव्याध, भगंदर, नासूर व फिशर या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अहमदाबाद (गुजरात) येथील सुप्रसिद्ध डॉ. देवेंद्र शहा यांचे बीड शहरात हे २२ वे शिबिर असून त्यांच्याकडून जवळपास साडेतीन हजार रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. त्यांच्यासोबत अहमदाबाद येथून डॉ. कुमार सोनवाला, डॉ. लीना रावल, डॉ. अरविंद पटेल, सौ. जोत्स्ना पटेल, डॉ. हसमुख पटेल, सौ. जागृती पटेल, दिल्लीहून डॉ. इंदू शर्मा, डॉ. सतीश कौशिक सोबत राहणार आहेत. मुळव्याध शिबिरात तपासणी व क्षारसूत्र पद्धतीने शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहे. महिलांसाठी महिला डॉक्टर देखील येत आहेत सर्व गरजू रुग्णांना आवाहन करण्यात येते की त्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

सदरील शिबिर विठाई हॉस्पिटल जालना रोड, बीड येथे आयोजित केले आहे. या शिबिरासाठी नाममात्र नाव नोंदणी फीस १००/- रुपये व क्षारक्षूत्र शस्त्रक्रिया फीस १०००/- रुपये ठेवण्यात आली असून तीन दिवसीय शिबिरात फक्त ५०० रुग्णांची तपासणी व १२५ रुग्णांवर शस्त्रक्रिया होतील तरी रुग्णांनी त्वरित नाव नोंदणी करावी.

बीड शहरातील विजय एजन्सी, संत सावता माळी चौक, बीड मो.नं. ९८२२३९००२४, बीड शेती सुधार केंद्र, जुना मोंढा, बीड मो.नं. ९४२२२४००५८, गणेश उडपी हॉटेल बस स्टँड समोर, बीड मो.नं. ९३७०४४१४१४, पायल साडी, सुभाष रोड, बीड मो.नं. ९४२२२४१२८५ विठाई हॉस्पिटल जालना रोड, बीड मो.नं. ८३०८८०४४१२ येथे नाव नोंदणी करावी असे आवाहन रोटरी क्लब बीड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# पाटोदा येथे संत बाळू देव महाराज महाविद्यालयात श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



पाटोदा । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०१ व्या जयंती निमित्ताने पाटोदा येथे संत बाळू देव महाराज विद्यालय व महिला कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा येथे साजरी करण्यात आली. यावेळी श्री संताजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र अविळे, शाळेचे मुख्याध्यापक बोखारेसर, गर्जे मॅडम, कोल्हे मॅडम, येवले मॅडम, मोहोळकरसर, देसाईसर, राम देसाई, थोरवेमॅडम, जावळेसर, काकडेसर, चंदनशिव बाबासाहेब चव्हाण, सांगळे मॅडम, बोडकेसर, नाईकनवरेसर, सचिन शिंदे व सर्व शाळेचे कर्मचारी उपस्थितीत होते.

# योजना शिक्षणाधिकारीपदी किरण कुंवर यांची नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

धुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती किरण कुंवर यांची बीड जिल्हा परिषदेच्या योजना शिक्षणाधिकारीपदी नियुक्तीचे आदेश सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने काढले आहेत. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव मो. बा. तासीलवर यांनी सदर आदेश निर्गमित केले आहेत.

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ मधील तत्सम अधिकाऱ्याची प्रशासकीय बदली करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. विहित कालावधीत संबंधितांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे, यासाठी आयुक्त शिक्षण यांनी अहवाल सादर करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

योजना शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले यांची लातूर येथे बदली झाल्यामुळे बीड येथील योजना शिक्षणाधिकारी पद रिक्त होते. या पदावर उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत यांच्याकडे प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे.

## संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील वैजवाडी येथील श्री गुरु संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे १३ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताह निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार गायक वादक आणि भजन असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत सोपान काका महाराज उखळीकर फडाच्या वतीने करण्यात आले आहे.

# दिलीप कांकरिया यांना मातृशोक

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील व्यापारी दिलीप, अजित, जितेंद्र कांकरिया यांच्या मातोश्री रामप्यारीबाई कांकरिया (८५ वर्ष) यांचे मंगळवार दि. ९ /१२/ २०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या कांकरिया परिवारातील सर्वात जेष्ठ सदस्य होत्या. त्यांच्या निधनाने कांकरिया परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



रामप्यारीबाई या अत्यंत धार्मिक व सहिष्णू वृत्तीच्या म्हणून ओळखल्या जात असत.

स्व. रामाप्यारीबाई यांचा अंत्यविधी आज बुधवार रोजी सकाळी १० वाजता अमरधाम पाटोदा येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात दिलीप, अजित, जितेंद्र ही ०३ मुले, शांता, लता या २ मुली, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

This Newspaper is published By Vilas Digambarrao Dolse,in front of Bus Stand, Patoda Dist. Beed, on behalf Vilas Digambarrao Dolse. edited by Vilas Digambarrao Dolse and printed by Vilas Digambarrao Dolse, Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. (Beed Justice)

# संचार

## जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**

संचार न्यूज ५

WhatsApp group

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

## दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा